आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३० जुलै २०२६ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- 'सार्वजनिक परीक्षा (अनुचित मार्गांचा प्रतिबंध) सुधारणा विधेयक,' राज्यसभेत आज मांडलं जाणार / लोकसभेची काल मंजुरी

- नीट पेपरफुटी आणि विद्यार्थी आंदोलन या मुद्द्यांवरुन संसदेत आजही गदारोळ, दोन्ही सभागृहांचं कामकाज २ वाजेपर्यंत तहकूब

- बिहार, गुजरात आणि मध्य प्रदेशात विधानसभा पोटनिवडणुकीसाठी मतदान सुरू

- ग्लासगो राष्ट्रकुल स्पर्धेत भारत १५ पदकं मिळवून ८व्या स्थानावर

**आणि**

- क्रिकेटपटू अजिंक्य रहाणेची आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्व प्रकारांतून निवृत्ती जाहीर

**<><><><><>**

नीट पेपरफुटीसह विविध मुद्द्यावरून विरोधी पक्ष सदस्यांनी केलेल्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब झालं. सकाळी ११ वाजता कामकाजाला सुरुवात झाली तेव्हा सभापती ओम बिरला यांनी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतल्या कामगिरीबद्दल भारतीय खेळाडूंचं अभिनंदन केलं. त्यांनी पॅरा-ॲथलीट दिलीप गावित यांनी जिंकलेलं सुवर्णपदक आणि मोहम्मद बासिल यांनी जिंकलेल्या रौप्यपदकाचा विशेष उल्लेख केला. तसंच, लांब उडी प्रकारात रौप्यपदक जिंकणारे मुरली श्रीशंकर यांचंही बिरला यांनी कौतुक केलं. त्यानंतर त्यांनी प्रश्नोत्तराचा पुकारला, मात्र विरोधकांनी स्थगन प्रस्ताव मांडायला सुरुवात केली. वारंवार विनंती करूनही कामकाजात व्यत्यय येत असल्यामुळे सभापतींनी कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब केलं.

जंतरमंतरवर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसी बळाचा अवाजवी वापर झाल्यासंदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून निवेदनाची मागणी विरोधकांनी आज राज्यसभेत केली. ती मान्य झाली नाही तेव्हा विरोधकांनी सभात्याग केला. कामकाजाला सुरुवात झाली तेव्हा विरोधी पक्ष सदस्यांनी शहा यांनी पोलिसांच्या कारवाईबाबत स्पष्टीकरण द्यावं अशी मागणी करत विरोधकांनी घोषणाबाजी सुरू केली. मात्र, अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी विरोधी पक्ष सदस्यांची मागणी फेटाळली आणि शून्य प्रहर पुकारला. मात्र, विरोधकांनी घोषणा देत सभात्याग केला. अधिवेशनाच्या सुरुवातीपासूनच विरोधकांचं वर्तन नकारात्मक राहिल्याची टीका केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी केली. दरम्यान, राज्यसभेचं कामकाजही दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

नीट पेपरफुटी, आणि विद्यार्थी आंदोलनावर पोलिसांकडून बळाचा वापर या मुद्द्यांवर इंडिया आघाडीच्या खासदारांनी आज संसद परिसरात निदर्शनं केली.

'सार्वजनिक परीक्षा (अनुचित मार्गांचा प्रतिबंध) सुधारणा विधेयक, २०२६' राज्यसभेत आज मांडलं जाणार आहे. हे विधेयक काल लोकसभेत मंजूर झालं आहे.

**<><><><><>**

जंतर मंतरवरच्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान पोलिसांनी चालवलेल्या पेलेट गन्समुळे जखमी झालेल्या आंदोलकांना वैद्यकीय उपचार मिळतील, याची खातरजमा करावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज दिल्ली सरकारला दिले. तसंच रॅपिड ॲक्शन फोर्सनं वापरलेल्या शस्त्रास्त्रांच्या मोजदादीची नोंद ठेवायचे निर्देशही केंद्र सरकारला दिले. नागरिकांची गर्दी पांगवण्यासाठी पेलेट गन्स आणि तत्सम साधनांचा वापर करण्यावर पूर्ण बंदी आणायची मागणी करणाऱ्या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. काही अपवादात्मक परिस्थितीत पेलेट गन्सचा वापर करायची परवानगी पोलीस नियमांमध्ये दिलेली आहे, त्यामुळे जोपर्यंत

हे नियम बदलत नाहीत, तोपर्यंत अशा शस्त्रांचा वापर बेकायदा ठरवता येणार नाही, असं मतही सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या पीठानं नोंदवलं. जर त्यांचा अवाजवी वापर झाला, तर या वापराविषयी नियमावली ठरवून द्यायची विनंती न्यायालयाला करता येऊ शकते, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी याचिकाकर्त्याला सुचवलं.

**<><><><><>**

बिहार, गुजरात आणि मध्य प्रदेशात विधानसभेच्या तीन जागांसाठीच्या पोटनिवडणुकीसाठी मतदान सुरू आहे. बिहारच्या बांकीपूर, गुजरात की मांजलपूर आणि मध्य प्रदेशच्या दतिया इथं मतदान सुरू आहे. मतदानाला सकाळी ७ वाजता सुरुवात झाली असून संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मतदान सुरू राहिल.

निवडणुक आयोगानं दिलेल्या माहितीनुसार सकाळी ११ वाजेपर्यंत पटनाच्या बांकीपूर विधानसभेच्या जागेसाठी साडे अकरा टक्के, गुजरातच्या मांजलपूर इथं १४ पूर्णांक २४ शतांश, मध्य प्रदेशच्या दतिया इथं ३२ पूर्णांक ३२ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली आहे.

**<><><><><>**

आय ए एस व्ही त्रिवेणी या तिन्ही दलांच्या महिला अधिकाऱ्यांच्या नौकानयन मोहिमेत सहभागी झालेल्या सदस्यांशी आज संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी संवाद साधला. यावेळी त्यांनी या महिला अधिकाऱ्यांच्या कामगिरीचं आणि साहसाचं कौतुक केलं. या मोहिमेच्या माध्यमातून महिलांनी कठोर लष्करी मोहिमा पार पाडण्याच्या महिलांच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या समजुतींना मोडीत काढल्याचं सिंग यावेळी म्हणाले. शारीरिक क्षमता, मानसिक कणखरता आणि नेतृत्वगुण हे लिंगनिरपेक्ष असतात हे या मोहिमेने सिद्ध केल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

ग्लासगो इथं सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत काल पुरुषांच्या पॅरा ॲथलॅटिक्स मध्ये १०० मीटर टी-47 स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारतीय खेळाडूंनी सुवर्ण आणि रौप्य पदकाची एकाच वेळी कमाई करत इतिहास घडवला.  दिलीप महादू गावीत याने सुवर्णपदक तर मोहम्मपद बासिल याने रौप्य पदक मिळवलं. तत्पूर्वी पुरुष गटाच्या लांब उडी स्पर्धेत मुरली श्री शंकर याने रौप्य पदक पटकावलं. या स्पर्धेत दोनदा पदक जिंकणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे.

दरम्यान, राष्ट्रकुल स्पर्धेत ऑलिम्पिक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा आज मैदानात पात्रता फेरीसाठी उतरणार आहे. ही पात्रता फेरी नीरजने यशस्वीरित्या पार केली तर उद्या तो पदकासाठी खेळेल.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत आतापर्यंत भारताने ३ सुवर्ण ९ रौप्य आणि ३ कास्य पदक अशी एकूण १५ पदक जिंकून पदक तालिकेत ८ व्या क्रमांकावर आहे.

**<><><><><>**

भारतीय क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्व प्रकारांतून निवृत्ती जाहीर केली आहे. समाज माध्यमावर चित्रफीत प्रसारित करून त्याने आज आपण निवृत्त होत असल्याचं म्हटलं. अजिंक्यच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीची सुरुवात २०१३मध्ये झाली होती. तो आतापर्यंत ८५ कसोटी, ९० एकदिवसीय आणि २० टी- ट्वेंटी सामने खेळला आहे. २०१८मध्ये झालेल्या इंग्लंड दौऱ्यात त्याने कर्णधारपदाची धुरा सांभाळली होती. २०२३मध्ये तो वेस्ट इंडिजविरुद्ध कसोटी संघात आपला शेवटचा सामना खेळला होता.

**<><><><><>**

कॅनडाच्या ओंटेरियो इथं सुरू असलेल्या स्क्वॅश कनिष्ठ सांघिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या पुरुष संघानं इंग्लंडला २-१ असं पराभूत करून  उपांत्य फेरीत भारताने धडक मारली आहे. उपांत्य फेरीत भारताची लढत अमेरिकेशी होणार आहे.

महिलांच्या उपांत्यपूर्व फेरीत भारतीय संघ अमेरिकेच्या महिला संघाकडून पराभूत झाला.

<><><><><>

अमरनाथ यात्रेला जाणाऱ्या १ हजार ७९५ यात्रेकरूंची २३ वी तुकडी पोलिस बंदोबस्तात आज जम्मूहून बालतालसाठी रवाना झाली. तर १ हजार ९४३ यात्रेकरू बालतालहून जम्मूत परतले आहेत. जम्मूहून अमरनाथ यात्रेसाठी जाणाऱ्या यात्रेकरूंची संख्या १ लाख ३४ हजार २०१ झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

<><><><><>

हिमाचल प्रदेशातल्या किन्नोर कैलास यात्रेला आजपासून सुरुवात झाली. श्रावण महिन्यात सुरू होणारी ही यात्रा १० ऑगस्टपर्यंत चालणार आहे.हवामानानुसार यात्रेच्या वेळापत्रकात बदल केला जाऊ शकतो, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

<><><><><>

ओडिशामध्ये पूरस्थिती निर्माण झाली असून एकंदर चार लाख नागरिकांना पूरस्थितीचा फटका बसला असून पुरात  चौघांचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. प्रशासनाकडून मदत आणि बचावकार्य युद्धपातळीवर सुरु आहे. आसामच्या काही भागांत पुढील तीन ते चार दिवसांत मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. अरुणाचल प्रदेश आणि नागालँडमध्ये होणाऱ्या या मुसळधार पावसाचा परिणाम आसाममधील सीमावर्ती जिल्ह्यांवर होण्याची शक्यता आहे. छत्तीसगढ आणि पश्चिम बंगालमधेही जोरदार पाऊस होत आहे.

आज दिवसभरांत मध्य महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील काही ठिकाणी तसंच, राजस्थानचा काही भाग, गुजरात, हिमाचल प्रदेश, केरळ, माहे, कर्नाटक,

मराठवाडा, पंजाब, उत्तराखंड आणि विदर्भाच्या काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता आहे

**<><><><><>**

देशात एप्रिल ते जून या तिमाहीत सोन्याची मागणी वर्षाच्या तुलनेत ६ टक्क्यांनी घसरून १३१ पूर्णांक ४ दशांश टक्क्यावर आल्याचं वर्ल्ड गोल्ड काउन्सिलच्या अहवालात म्हटलं आहे. सीमाशुल्कात झालेली वाढ, सोन्याची खरेदी कमी करण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आवाहन आणि हंगामी कारणांमुळे खरेदीत आलेली मंदी यामुळे ही घट झाल्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत ही मागणी १३९ पूर्णांक ७ दशांश टन इतकी होती.

**//<><><><><>//**